Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 18 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १८ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आपल्या असाम आणि पश्चिम बंगाल दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी विविध उपक्रमांत सहभाग घेणार आहेत. त्यांनी आज गुवाहाटी येथील सरुसजाई क्रीडा संकुलामध्ये बोडो समुदायाचा समृद्ध वारसा साजरा करणारा ऐतिहासिक सांस्कृतिक कार्यक्रम 'बागरुम्बा द्वौ 2026' मधील आपल्या सहभागाची दृष्ये सामाजिक संपर्क माध्यमातून सादर केली. पंतप्रधानांच्या हस्ते काझीरंगा एलीव्हेटेड कॅरीडोर प्रकल्प उभारणीला सुरुवात होणार आहे. ते कोलकाता इथं नव्या दोन अमृत भारत जलद रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते सिंगूर इथं आज ८३० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं उदघाटनही होणार आहे.

****

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मोहोळनजिक देवडी पाटीजवळ मध्यरात्री झालेल्या मोटर अपघातात त्यातील पाच जण जागिच ठार तर एक महिला जखमी झाली. मध्यरात्री उशिरा- बारा वाजेनंतर पनवेलहुन अक्कलकोटला देवदर्शनासाठी निघालेल्या मोटारच्या चालकाचा ताबा सुटल्याने रस्त्याच्या कडेला झाडावर अदाळून ही भीषण दुर्घटना झाली. मृतात तीन पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे.

****

मराठी चित्रपट पुढे जावेत आणि त्यांना प्रेक्षकांनी अधिकाधिक पाठिंबा देण्याठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी काम करत असून, नागपूर आणि नाशिक इथं चित्रनगरी उभारण्याची प्रक्रिया सध्या सुरू असल्याचं महाराष्ट्र चित्रपट आणि सांस्कृतिक रंगभूमी विकास प्राधिकरण, सह-व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर यांनी सांगितलं आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव -पिफमध्ये आयोजित चर्चासत्रात ते काल बोलत होते. महाराष्ट्र शासनाचं चित्रपट धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचंही ते म्हणाले.

****

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. राज्यात काल सर्वात कमी आठ पूर्णांक तीन दशांश सेल्सियस तापमान गोंदिया इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल नागपूर इथं दहा पूर्णांक दोन तर जळगाव इथं साडे दहा अंश तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात मात्र गेल्या दोन दिवसांपासून तापमानात वाढ झाली आहे. बीड तसंच परभणी इथं किमान तापमान १४ अंश, नांदेड इथं १४ पूर्णांक आठ तर छत्रपती संभाजीनगर इथं १५ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****

भारत आणि न्यूझीलंडदरम्यान तिसरा आणि अखेरचा एकदिवसीय क्रिकेट सामना आज इंदूर इथं खेळला जाणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल. तीन सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ एक – एकनं बरोबरीत आहेत.

****

देशभरातील भाविक मौनी अर्थात पौष दर्श अमावस्येनिमित्त देशभरात ठिकठिकाणी नद्यांमध्ये पवित्र मानल्या जाणा-या स्नानासाठी गर्दी करत आहेत. उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथं त्रीवेणी संगमावर हजारो भाविकांनी मोठ्या संख्येनं माघ मेळ्यांतर्गत स्नानासाठी आजही गर्दी केल्याचं वृत्त आहे.

****

राष्ट्रीय युवा दिनाच्या अनुषंगाने काल लातूर इथं नशामुक्त भारत अभियान राबवण्याच्या दृष्टीनं जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, राजर्षी शाहू महाविद्यालय आणि ५३ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना - एनसीसी यांच्या संयुक्त विद्यमानं प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या सामाजिक, मानसिक आणि शारीरिक दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन केलं.

****

बीड जिल्ह्यात पोलिस पाटील पद भरतीसाठी उद्यापासून अर्ज प्रक्रिया सुरू होत आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या संदर्भात आदेश निर्गमित केले. विविध गावांतील मधील अनेक दिवसांपासून ही पदं रिक्त होती. पदभरतीत पारदर्शकता - एकसूत्रता राहण्यासाठी उपविभागीय स्तरावर गावनिहाय आरक्षण अंतिम करण्यात आले आहे. या भरती प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहिता पालनासह न्यायालयीन निर्देश पालनाबाबत दक्षता घेतली जाणार आहे.

****

नांदेड इथं येत्या २४ आणि २५ जानेवारी रोजी होणाऱ्या "हिंद-दी-चादर" या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्व सामाजिक संस्था, संघटना तसंच स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी सकारात्मकतेने पुढाकार घ्यावा असं आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केलं. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या हौतात्म्य वर्षानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. २४ जानेवारीला सचखंड गुरुद्वारा इथून निघणाऱ्या मिरवणुकीतही सहभाग घेण्याचं आवाहन कर्डिले यांनी केलं आहे.

दरम्यान, गुरू तेगबहादूर यांच्या कार्याची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी परभणी जिल्ह्यात शाळा-महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात येणार आहे. शिक्षणाधिकारी सुनील पोलस आणि डॉ. सविता बिरगे यांनी ही माहिती दिली.

****